| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**<br>डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१ | |

| | | |
|---|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा<br>(राआमाजीआका)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य | | संकेतस्थळ - arogya.maharashtra.gov.in<br>कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०<br>मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०<br>ई-मेल crs_d83@yahoo.com |

**परिपत्रक**
**महत्वाचे**

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८ ३/जन्म-मृत्यू नोंदी मधील दुरुस्ती/428-1136/१९
दिनांकः- 16/1/२०१९

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू,
जिल्हा परिषद ..............(सर्व)

२) गटविकास अधिकारी तथा अप्पर जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू,
पंचायत समिती..............(सर्व)

३) आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु,
महानगरपालिका,.....(सर्व)

४) मुख्याधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु,
नगरपरिषद/नगरपालिका/नगरपंचायत.........(सर्व)

५) व्यवस्थापक, कॅन्टोंमेंट बोर्ड, ......(सर्व)

विषय :- **जन्म व मृत्यु नोंदी मधील** दुरुस्ती **बाबत...**

जन्म किंवा मृत्यु नोंद झाल्यावर त्यामध्ये काहीवेळा चुका होतात. सदर चूक दुरुस्तीसाठी संबंधित व्यक्तिस किंवा निबंधक कार्यालयातील व्यक्तीस चूक दुरुस्ती बाबतचे मार्गदर्शन घेण्यासाठी परस्पर उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, पुणे कार्यालयात पाठविण्यात येते किंवा पत्राव्दारे मार्गदर्शन मागविण्यात येते. सदर बाब चुकीची असून निबंधकस्तरावर चूक दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

अधिनियमाच्या अधिन राहून सदर चूक दुरुस्ती बाबत निर्णय घेण्यास निबंधक, जन्म-मृत्यू सक्षम प्राधिकारी आहेत. या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेली महत्वाची परिपत्रकांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपण सदर प्रकरणाचा निपटारा करु शकता. फक्त गुंतागुंतीची प्रकरणे आपल्या कार्यालयाच्या उपरीपत्राने या कार्यालयास पाठवावीत. उपरी पत्रात सदर प्रकरणाबाबत संपूर्ण माहिती व आपला अभिप्राय/मत नमूद करणे आवश्यक आहे. जेणेकरुन मार्गदर्शन करणे सोईचे होईल.

कोणत्याही व्यक्तिस त्याचे प्रकरण घेऊन परस्पर या कार्यालयास पाठवू नये. सदर परिपत्रकाची प्रत सर्व ग्रामसेवकांना व शहरी भागातील निबंधकांना पाठविण्यात यावी. या परिपत्रकाबाबत केलेली कार्यवाही या कार्यालयास उलट टपाली कळवावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीसाठी सादर : मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य,मुंबई

F:83/Circular.2019